Please Consider the Environment Before Printing… **Date: 17/04/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष

## वनस्पतिशास्त्रज्ञ डॉ. वामन वर्तक



प्रा. डॉ. वामन दत्तात्रेय वर्तक हे एक मराठी वनस्पती शास्त्रज्ञ होते. त्यांचा जन्म १९ नोव्हेंबर १९२५ रोजी भोर संस्थान, महाराष्ट्र येथे झाला. त्यांचे शिक्षण पुण्यात झाले. पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात शिकत असताना त्यांच्यावर प्रा. आपटे आणि प्रा. कोल्हटकर यांचा प्रभाव होता. पुण्याचा परिसर, गोव्यापर्यंतची सह्याद्रीची पर्वतराजी येथील बहुतेक सर्व वनस्पती त्यांनी नोंदविल्या. त्यांनी फर्ग्युसन महाविद्यालयात दहा वर्षे वनस्पतिशास्त्राचे अध्यापन केले. त्यानंतर प्रा. शंकर पुरुषोत्तम आघारकर यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या विज्ञानवर्धिनी या संशोधन संस्थेत ते वनस्पतिशास्त्राचे एक संशोधक म्हणून काम करू लागले. त्यावेळी वर्तकांनी आघारकरांच्या मार्गदर्शनाखाली वनस्पतिसमूहावर आपला पीएच.डी.चा प्रबंध लिहिला. तेथे प्रा. वर्तक काही काळ वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख होते आणि नंतर ते त्या संस्थेचे संचालक म्हणून तेथून निवृत्त झाले. तत्पूर्वी त्यांनी १६ पीएच.डी. प्रबंधांसाठी मार्गदर्शन केले.

जेथे वनस्पती नैसर्गिकरीत्या उगवतात त्या जागेचे निरीक्षण करणे, त्या त्या वनस्पतींचे शास्त्रशुद्ध वर्णन करणे आणि त्यांची नावे ओळखणे हे त्यांच्या आवडीचे विषय होते. त्यांनी स्वत: गोळा केलेल्या वनस्पतींच्या १५००० नमुन्यांचा कागदावर चिकटवलेला संग्रह त्यांच्यापाशी होता. त्याशिवाय १२००० सुटे नमुने आणि बाटल्यातून साठवलेले १००० नमुने असा प्रचंड खजिना त्यांच्यापाशी होता. वनस्पती ओळखून त्याची नोंद केल्यावर प्रा. वर्तक त्या वनस्पतीचे औषधी गुणधर्म व इतर उपयोग, त्यांची पारंपरिक उपयुक्तता आणि वनवासींची औषधी म्हणून वापरण्याची पद्धत या गोष्टींच्या साक्षेपाने नोंदी ठेवीत. वामन वर्तक यांचे १७ एप्रिल २००१ रोजी पुणे येथे निधन झाले.